रविवार आवृत्ती
अंकासोबत स्मार्ट + प्रवाह पुरवणी
# पुण्य नगरी
रविवार, ४ नोव्हेंबर २०१८ ।मुंबई ।वर्ष : १९ ।अंक : २१२ ।पाने १०+४+६=२० ।किंमत : ५.००
www.epunyanagari.com
Toll Free : 9773927928

रविवार, ४ नोव्हेंबर २०१८
पुण्य नगरी स्मार्ट मुंबई



शिवकृपा सहकारी पतपेढीला महाराष्ट्र शासनाचा सहकार पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्कार सोहळ्यात सहकार मंत्री सुभाष देशमुख, राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष शेखर चरेगावकर यांच्या हस्ते सहकार भूषण पुरस्कार स्वीकारताना संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष कृष्णा शेलार, उपाध्यक्ष वसंत चव्हाण, संस्थापक संचालक चंद्रकांत वंजारी आणि संचालक मंडळ आदी.

## शिवकृपा सहकारी संस्थेला 'सहकार भूषण' पुरस्कार

**।मुंबई :** राज्याच्या सहकार क्षेत्रात दीपस्तंभाप्रमाणे उत्कृष्ट काम करीत असलेल्या शिवकृपा सहकारी पतपेढी या संस्थेला सन २०१६-१७ या वर्षीचा महाराष्ट्र शासनाचा सहकार भूषण हा अत्यंत मानाचा पुरस्कार राज्याचे सहकार मंत्री सुभाष देशमुख व राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष शेखर चरेगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला आ. अॅड. आशिष शेलार, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर, सहकार विभागाचे प्रधान सचिव आभा शुक्ला आणि सहकार आयुक्त सतीश सोनी आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात रोख रक्कम व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या वेळी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष कृष्णा शेलार, उपाध्यक्ष वसंत चव्हाण, संस्थापक संचालक चंद्रकांत वंजारी, माजी अध्यक्ष अविनाश भोसले व इतर सर्व संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते.